I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 194-196
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# चंद्रपूर जिल्हयातील रमाई आवास योजनेतील ग्रामीण विकासात योगदान

प्रा. माया ई. डकाहा

अर्थशास्त्र विभाग,
आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा जि. चंद्रपूर
Corresponding Author : mayadakaha@gmail.com

Communicated : 29.03.2022 | Revision : 02.04.2022 Accepted : 08.04.2022 | Published : 02.05.2022

**सारांश :**

मानव अनेक प्रयत्न करूनही काही आर्थिक अडचणींमुळे घराचे स्वप्न साकार करू शकत नाही. भारतातील मोठ्या प्रमाणात असलेली आर्थिक व सामाजिक विषमता कमी करून दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या विशिष्ट जातीच्या मागासवर्गीय कुटुंबांच्या सामाजीक जीवनात परिवर्तन होऊन समाजात त्यांना एक ओळख व प्रतिष्ठा प्राप्त व्हावी या उद्देशाने राज्य शासन व केंद्र शासनाने वैयक्तिक लाभाच्या दृष्टीने घरकुल योजना राबविल्या आहेत. २०१६ पासून दरवर्षी २० नोव्हेंबरला 'राष्ट्रीय आवास दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

राज्य शासनाच्या या योजनेद्वारे लोकसहभागातून ग्रामीण विकास शक्य आहे. १९६२ साली महाराष्ट्रात पंचायत व्यवस्था निर्माण झाली. अशा या त्रीस्तरीय व्यवस्थेत जिल्हा परिषद जिल्हा पातळीवर, पंचायत समिती तालुका पातळीवर व ग्राम पंचायत ग्राम पातळीवर घरकुलाचे काम गुणवत्तापुर्वक व्हावे त्यात गतीमानता यावे याकरीता राज्य शासनाच्या वतीने रमाई आवाज ही योजना राबविण्यात येत आहे. ''रमाई आवास योजना २०२२'' या प्रगतीच्या अहवालानूसार राज्यात नवीन १ लाख ३६ हजार घरकुल मंजूर करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेणारे ग्रामीण लाभार्थ्यांचे सामाजिक व आर्थिक परिस्थितीत सुधारणा होवून जीवनस्तर उंचावलेला दिसून येत आहे.

**बीजशब्द :** रमाई आवाज योजना, दारीद्रय रेषेखालील अनुसूचीत जाती, नवबौध्द घटक

**प्रस्तावना :**

भारतात १९४७ च्या विभाजनानंतर शरणार्थी कुटुंबाकरिता आवास कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली होती. ही योजना १९६० पर्यंत कार्यान्वित राहिली. याच काळात १९५७ मध्ये सार्वजनिक विकास कार्यक्रमाचा एक भाग म्हणून 'ग्रामीण आवास योजनेची' निर्मिती करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून अर्जदारास रु. ५००० पर्यंत प्रतीघराकरिता कर्जाची सुविधा शासनाने उपलब्ध करून दिली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जनतेचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. १९७१ चे भारत—पाक युद्ध व बंगला निर्वासितांचा प्रश्न यामुळे चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या तीन वर्षात अर्थव्यवस्थेतील ताण वाढला. म्हणून १९७३ मध्ये लोकसभेनी न्या. भगवती ही समिती निर्माण केली. या समितीने देशाच्या वास्तविक स्थितीच्या निरीक्षणातील सखोल अध्ययनात ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या मागासवर्गीय जातीतील ८३ टक्के लोकसंख्येपैकी ७३ टक्के कुटुंबांना राहण्याकरिता पक्की घरे नसल्याचे आढळून आले.

ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत १९८० मध्ये भारत सरकारने 'इंदिरा आवास योजनेची' निर्मिती केली. ही योजना राज्या—राज्यात एकसूत्रता आणण्याकरिता १९९५—९६मध्ये भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रमाच्या अंतर्गत फक्त अनुसूचित जाती—जमातीकरिता सुरु करण्यात आली. या योजनेचा लाभ इतर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला होत नव्हता म्हणून १५ जुन २०१५ ला या योजनेचे प्रधानमंत्री आवास योजना असे नामकरण करण्यात आले ही योजना ७ वर्षाची असून ती २०२२मध्ये पूर्ण होईल. याच कालावधीत महाराष्ट्र शासनाद्वारे १५ नोव्हेंबर २००८ रोजी. 'रमाई आवास योजना' सुरु करण्यात आली. ही योजना पूर्णपणे राज्य शासनाची असल्यामुळे केवळ अनुसूचित जातीतील व नवबौध्द घटकांतील आर्थिक दृष्ट्य मागासलेल्या बेघर कुटुंबांना आपले बांधकाम पूर्ण करण्याकरिता (ग्रामीण क्षेत्र, नक्षलवादी क्षेत्र व शहरी क्षेत्र) क्षेत्र निहाय अनुदान देण्यात येत आहे.

**विषय निवडीचे प्रयोजन :**

कोविड १९ च्या वैश्विक माहामारीच्या कारणास्तव ज्या श्रमिकांनी आपली नौकरी आणि आपले नातेवाईकांना गमावलेले आहे. अशा पिडीतांना लक्षीत करून संशोधिकाने या विषयाची निवड केलेली आहे.

रमाई आवास योजनेच्या उद्देशानुसार अनुसूचित जाती व नव बौद्ध कुटुंबांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा, झोपडपट्टीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून लाभार्थांनी शासकीय अनुदानाचा योग्य वापर करून ग्रामीण किंवा शहरी भागात चांगले पक्के, मजबूत घर तयार करावे. म्हणून सदर योजनेची अंमलबजावणी ग्रामीण भागातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व शहरी भागातील नगर परिषद व महानगर

पालिका यांच्या माध्यमातून पार पाडण्यात येत आहे. परंतु काही विशेष अडचणींमुळे जसे नवे शासकीय धोरण, अधिकारी–कर्मचारी यांचा कामचुकारपणा, लाभार्थ्यांच्या अनास्थेमुळे बऱ्याच लाभार्थींनी आपले घर पूर्ण केले नाही. यासाठी रमाई आवास योजनेचे अध्ययन अभिप्रेत आहे. ही योजना ग्रामीण विकासात कितपत यशस्वी झालेली आहे? या योजनेत मंजूर झालेली घरकूल अजूनही अपूर्ण का आहे? घरकुल मिळालेल्या लाभार्थ्यांची सामाजिक – आर्थिक प्रगती झाली आहे का? ह्यांचे सखोल अध्ययन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात येत आहे.

**रमाई आवास योजना :**

रमाई आवास योजना ही ग्रामीण विकास मंत्रालयाची एक प्रमुख योजना असून या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांसाठी दारीद्र्य रेषेखालील आणि दारीद्र्य रेषेवरील कुटूंबाना आर्थिक सहाय्य देवून त्यांना पक्क्या निवासांची सुविधा उपलब्ध करून देणे आहे. ही योजना पुर्णपणे राज्य सरकारद्वारे राबविण्यात येत असून राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांना क्षेत्र निहाय – ग्रामीण क्षेत्रासाठी (१ लाख ३२ हजार), नक्षलग्रस्त डोंगरक्षेत्रासाठी (१ लाख ४२ हजार), नगर परिषद /नगर पालिका (२ लाख ५० हजार) आर्थिक सहाय्य दिले जात आहे. ह्या योजनेत काही अटी व शर्ती दिलेल्या आहे.

१) या योजनेत जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान झाल्यास अट्रासिटी ॲक्ट नुसार अत्याचार पिडीत अनुसूचीत जातीचे कुटूंब, नैसर्गिक आपत्तीचे बाधीत कुटूंब, विधवा महिला यांना प्राधान्य देण्यात येईल.

२) लाभार्थ्यास अनुदान हे चार टप्यात देण्यात येते. पायवा स्तर ५० हजार, सज्जा स्तर ७५ हजार, स्लॅब पुर्ण झाल्यावर १ लाख, चौथा स्तर २५ हजार अनुदान देण्यात येईल.

३) लाभार्थी हा नगर पालिका, महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्र्य रेषेवरील असेल तर त्यांना ७.५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागेल. आणि लाभार्थी हा नगर पालिका व महानगरपालिका क्षेत्रातील असल्यास दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाला लाभार्थी हिस्सा भरण्याची आवश्यकता नाही.

**समस्या :**

ग्रामीण क्षेत्रातील अशिक्षित, अज्ञानी कुटूंबांना तसेच नक्षलवादी आदिवासी कुटूंबांना या योजनेविषयी पुर्ण माहिती मिळत नसते. तसेच शासनाचे आलेले नवे धोरण त्यांच्या पर्यंत पोहोचलेले नसते ह्यामुळे ही योजना राबविण्यात अनेक समस्या निदर्शनास आल्या

१) रमाई आवास योजनेत काही भ्रष्टाचार दिसून येत आहे.
२) रमाई आवास योजनेच्या नवीन अटी व शर्ती कोणकोणती आहे. या विषयी गावकऱ्यांना माहीती मिळत नसतो.
३) मंजूर झालेल्या लाभार्थ्यांचे घर अजूनही अपूर्णच आहे.
४) लाभार्थ्यास अनुदान ४ टप्यात देण्यात येते. हे अनुदान वेळेवर न भेटल्यास किंवा पुर्ण टप्पे न भेटल्यास त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.
५) घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांच्या नावी २६९ चौ. फु. जागा त्यांच्या नावी असने आवश्यक असते. परंतु इतकी जागा त्यांच्या जवळ नसल्यास त्यांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही.
६) झोपडपट्टीत राहणारे अनुसूचीत जातीतील कुटूंबांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही. कारण हे कुटूंब अतिक्रमणाच्या किंवा लिचच्या जागेवर वास्तव्य करीत असतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) चंद्रपूर जिल्हातील ज्या लाभार्थ्यांना घरकुल वाटपाचा लाभ प्राप्त झाला त्यासंबंधीचा आढावा घेणे.
२) घरकुल वाटपामुळे लाभार्थ्यांचा आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये काय परीणाम झाला ते तपासणे.
३) रमाई आवास योजनेचे यशापयश तपासणे.
४) घरकुल वाटप करतांना येणाऱ्या अडचणी व त्यांची कारणमिमांसा करणे.
५) घरकुल वाटप योजनेमुळे लाभार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा रितीने झाला आहे. त्यांचे मुल्यमापण करणे.
६) रमाई आवास योजनेत ज्या कुटूंबाना या योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यांना याचा लाभ कसा मिळवून देता येईल याचा अभ्यास करणे.
७) रमाई आवास योजनेंच्या उद्दिष्ट पुर्तीचे सखोल अध्ययन करुन त्यात आवश्यक असलेले उपाय सूचविणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :**

१) रमाई आवास योजनेच्या कामामुळे दारीद्र्य रेषेखालील राहणाऱ्या लाभार्थ्यांच्या राहणीमाणात सुधारणा झाली.
२) रमाई आवास योजनेचा अंतर्गत लाभार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर अनुकूल परिणाम पडलेला आहे.
३) रमाई आवास योजनेचे यश अपयश तपासणे.
४) ग्रामीण क्षेत्रातील प्रगतीसाठी भविष्यातही ही योजना चालू ठेवणे अत्यावश्यक आहे.
५) शासकीय आधाराशिवाय ग्रामीण विकासाचे भवितव्य निराशावादी आहे.

**संशोधन पध्दती :**

संशोधन पध्दती निवड करण्यात आलेल्या विषयाचे अध्ययन करण्यासाठी अभ्यास पध्दतीची योजना तयार करणे संशोधकास अति आवश्यक असते. संशोधन हे सामाजिक व आर्थिक जीवनाविषयी सामाजिक घटनेचे अध्ययन करते यासाठी अभ्यास पध्दतीची योजना तयार केली तर विशिष्ट कालावधीपर्यंत अभ्यासाचे हेतू पुर्ण होऊ शकते संकलीत झालेली तथ्य पडताळून नवीन सिध्दांत प्रतिपादन करता येते. संशोधकास समाजविषयीचे ज्ञान व माहिती मिळणे शक्य होते म्हणून समाज, सामाजिक घटना, आर्थिक घटना, वास्तविक घटना यामध्ये कार्यकारण संबंध प्रस्थापित करता येते. याकरिता जिल्ह्यातील एकूण १५ तालुके आणि गावे आहेत. लाभधारकांची संख्या बरीच जास्त असल्यामुळे सर्वच लाभधारकांची मुलाखत न घेता नमुना निवडक पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. एकूण लाभधारकांची सख्या १६७७५ आहे.

संशोधिका प्राथमिक व द्वितीयक स्त्रोताद्वारे माहीती एकत्रित करेल.

**प्राथमिक स्त्रोत :**

प्राथमिक स्त्रोतात शास्त्रीय दृष्ट्या नमूना निवड या पध्दतीची निवड करण्यात येईल याकरीता चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील रमाई योजनेच्या लाभार्थ्यांकडून प्रश्नावली भरुन व मुलाखतीद्वारे माहिती संकलित करेल. ग्रामीण क्षेत्रात सरपंच, ग्रामसेवक, कुटुंब प्रमुख इतर संबंधित व्यक्ती यांची तसेच शहरी क्षेत्रात जिल्हा समन्वय अधिकारी, जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी, संबंधित अधिकारी यांची संबंधित विषयावर मुलाखत व प्रश्नावली द्वारे माहिती संकलित केल्या जाईल.

द्वितीयक स्त्रोत

द्वितीय स्त्रोतात संशोधिका विविध अहवाल, विविध, वृत्तपत्रे, मासिक, पुस्तके, महाराष्ट्र राज्य आर्थिक सर्वेक्षण योग्य अशी ूमइेपजमए हववहसमए लवनजनइमए दमू यांच्या माध्यमातून माहिती संग्रहीत करुन अध्ययन करण्यात येईल.

**निष्कर्ष :**

आतापर्यंत केलेल्या अध्ययनावरून तसेच समाजकल्याण विभागातर्फे 'रमाई आवास योजनेचे' चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण विभागातील उद्दिष्टयेपुर्तीच्या (२०१०—२१) या तक्त्यातुन असे लक्षात येते की, चंद्रपूर जिल्ह्यात फक्त ग्रामीण भागात राज्य शासनाचे ३३,१९५ रमाई घरकुलाचे उद्दिष्ट होते. त्यापैकी २९७८३ घरकुल मंजूर झालेली आहे. परंतू ह्यातून १३००८ घरकुल अपूर्ण आहे. या योजनेचा लाभ १६७७५ कुटूंबांना मिळालेला आहे. चंद्रपूर जिल्ह्याचा ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी ही योजना एक वरदान ठरलेली आहे. दारिद्र्य रेषेखालील अनुसूचीत जातीतील नवबौध्द घटकांचा मागासवर्गीय कुटूंबांचा राहणीमानाचा दर्जा उंचावलेला आहे. या योजनेचे ग्रामीण विकासावर अनुकूल परिणाम दिसून येत आहे. म्हणून ग्रामीण क्षेत्राच्या सतत विकासासाठी 'रमाई आवास योजना' चालू ठेवने फार आवश्यक आहे. शासनाच्या आधाराशिवाय ग्रामीण विकासाचे भवितव्य अंधारमय आहे.

**संदर्भ :**

वैद्य प्रा. एन.बी.— विदर्भातील अर्थव्यवस्था (आकडेवारीचा आशय) नागपूर, श्री मंगेश प्रकाशन, २००३

पाटील एकनाथ — स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, स्पर्धा विश्व पब्लीशर्स

मिश्री पूरी — भारतीय अर्थव्यवस्था— हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २०१०

भांडारकर पु.ल. —सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती, नागपूर, १९९६

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन — जिल्हा चंद्रपूर २०१७—१८

वर्तमान पत्र — सकाळ, महाराष्ट्र टाईम्स

**संकेत स्थळे**

www.ramaiaavasyojana.com

https://vikaspedia.in>social welf

shivsurya 93. Blogspot.com